# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २५ एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.२५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व्याख्यानमालेत अमेरिकेतील नॅशनल स्पेस सोसायटीचे संचालक इंजि.अविनाश शिरोडे यांचे "कुतूहल अंतराळ विज्ञानाचे" या विषयावरील ऑनलाईन व्याख्यान शनिवार, दि.३० एप्रिल रोजी दुपारी ४.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान झुम-लिंक, युटयुब तसेच फेसबुकवरुन प्रसारीत होईल. व्याख्यानाची लिंक विद्यापीठ संकेतस्थळ www.nmu.ac.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल. या व्याख्यानाचा लाभ श्रोत्यांनी घ्यावा असे आवाहन विभागाचे प्र.संचालक प्रा.मनीष जोशी यांनी केले आहे.

## बातमी क्र.२

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत विद्यापीठीय केमिकल टेक्नॉलाजी संस्थेतील तृतीय व चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी "रिझ्युम बिल्डींग" कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत डेल कार्नेगी प्रमाणित व्यावसायिक प्रशिक्षक राहुल त्रिवेदी (जी.एच.आर. इंस्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, जळगाव) यांनी रेझ्युमे व रेझ्युमे बिल्डींग याचे महत्त्व व फरक सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रेझ्युम तयार करण्याचे प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करुन घेतली. यावेळी अध्यक्षस्थानी समन्वयक प्रा.रमेश सरदार हे होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा यांनी केले. शनिवारी, २३ एप्रिल रोजी ही कार्यशाळा विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात घेण्यात आली. एकूण १२० विद्यार्थी या कार्यशाळेत उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी